# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे- ०४

# इ. १० वी साठी खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी विभागीय मंडळांना सूचना

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रु - मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांची (फॉर्म नं. १७) ऑनलाईन नावनोंदणी दिनांक – ०१/०८/२०२६ पासून सुरु करण्यात येत आहे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सर्व माध्यमिक शाळांमधून फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तरी इ. १०वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरिता सर्व माध्यमिक शाळा मंडळाच्या अटी-शर्तीनुसार नावनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत.

सबब सर्व माध्यमिक शाळांनी याची नोंद घेऊन शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या परंतु किमान इ. ५वी उत्तीर्ण असलेल्या मुला-मुलींना माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होऊन शिक्षण प्रवाहात येण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक सूचना मंडळाच्या **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. नावनोंदणी प्रक्रियेबाबत प्रकटन काढून त्याबाबतची माहिती सर्व विभागीय मंडळांनी संबंधितांना देण्यात यावी.

१.माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रु मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत-

| अ.क्र | तपशील | नियमित/विलंब /अतिविलंब शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी **नियमित** नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत जमा करणे. | शनिवार दि. ०१/०८/२०२६ ते बुधवार दि. ३०/०९/२०२६ |
| २. | विद्यार्थ्यांनी **विलंब** शुल्काने नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत जमा करणे, | (प्रति विद्यार्थी रू.१००/-) गुरुवार दि. ०१/१०/२०२६ ते गुरुवार दि. १५/१०/२०२६ |
| ३. | विद्यार्थ्यांनी **अतिविलंब** शुल्काने नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन मूळ अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावती च्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | (प्रति विद्यार्थी प्रति दिन रू.२०/-) शुक्रवार दि. १६ /१०/२०२६ ते शनिवार दि.३१/१०/२०२६ |

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १० वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. इ.५वी पास तसेच इ.६वी ते इ.९वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी त्याच्या यापूर्वी शिकलेल्या शाळेतून इ.१०वी साठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज भरणे अनिवार्य आहे.त्यासाठी विद्यार्थ्यांनी त्या शाळेत जाऊन शाळेचा सांकेतिक कमांक, विषय योजना, माध्यम व इतर आवश्यक माहिती घेऊनच नावनोंदणी करावी व परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्याने सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या रहिवासी दाखल्यावरील पत्ता नमूद करणे आवश्यक आहे.

४. इ. १० वीच्या परीक्षेसाठी नावनोंदणी अर्ज करतांना विद्यार्थ्यांनी http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरील Student Corner या option चा वापर करावा, अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

५. विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरिता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास द्वितीयप्रत प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो स्वतःजवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर मूळ कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव विद्यार्थ्यांकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे.

६. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो (pdf) काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल कमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

७. संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर अर्जाबाबतची संपूर्ण माहिती तसेच त्याने upload केलेली सर्व मूळ कागदपत्रे त्याच्या Login मध्ये उपलब्ध राहतील. सदर अर्जाची प्रत (printout) विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर पाठविली जाणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांनी या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, ऑनलाईन शुल्क भरल्याची पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत printout काढून घ्यावी.

८. विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या माध्यमिक शाळेत विहीत मुदतीत जमा करावयाची आहेत.

९. <u>खाजगी विद्यार्थी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे</u> –

रु. १११०/- नाव नोंदणी शुल्क रु. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing Fee)

रु. १००/- विलंब शुल्क प्रति विद्यार्थी.

रु. २०/- अतिविलंब शुल्क प्रति विद्यार्थी प्रति दिवस

१०. संबंधित शाळेने ऑनलाईन / प्राप्त झालेल्या अर्जातील माहिती तसेच upload केलेल्या सर्व मूळ कागदपत्रांच्या प्रती शाळेत जमा असल्याबाबतची खात्री करावी व त्याची पडताळणी करुन माहिती/कागदपत्रे अपूर्ण असल्यास सदर अर्ज "अपूर्ण" (Incomplete) या प्रकारे नोंदवून विद्यार्थ्यांकडे त्रुटी पुर्ततेसाठी पाठवावयाचे आहेत. तसेच इतर परिपूर्ण अर्ज व कागदपत्रे विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पाठवावयाचे आहेत व मूळ कागदपत्रे शाळेमध्येच ठेवावयाची आहेत.

११. सदरील काम करणाऱ्या शाळेतील मुख्याध्यापक / ज्येष्ठ शिक्षक व लिपिक यांना या कामाबाबत पुढील दराने मानधन देण्यात यावे- **अ) मुख्याध्यापक तथा ज्येष्ठ शिक्षक -**

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रू १५०/- |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रू.१५०/- + रू १० /-प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रू. ५००/- |

ब) लिपिक -

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रू.१००/- |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रू.१००/- + रू. १०/- प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रू.२००/- |

१२. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्याने त्याच्या यापूर्वी शिकलेल्या माध्यमिक शाळेचे नाव व पत्ता नमूद करणे आवश्यक आहे व परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्याने सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या रहिवासी दाखल्यावरील पत्ता नमूद करणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधित माध्यमिक शाळेने विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे व यासंदर्भातील गुण online पध्दतीने नोंदवून मंडळाकडे विहीत मुदतीत पाठवावयाचे आहेत व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकिटात, पाकिटावर माध्यमिक शाळेचे नाव, सांकेतिक क्रमांक (index no.) टाकून विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत.

१३. विभागीय मंडळ स्तरावर खाजगी विद्यार्थ्यांचे अर्ज Maker / Checker पध्दतीने तपासावयाचे आहेत. माध्यमिक शाळांकडून प्राप्त झालेले अर्ज नेमून दिलेल्या जिल्हा/तालुका नुसार संबंधित कर्मचाऱ्याला (Desk1 user) त्यांचे Login मध्ये उपलब्ध होतील.

१४. संबंधित खाजगी विद्यार्थ्यांनी त्यांच्या मागील माध्यमिक शाळेमधून खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी अर्ज भरला आहे ,याची खात्री विभागीय मंडळांनी करावी .

१५. संबंधित कर्मचाऱ्यांनी online पध्दतीने प्राप्त अर्ज तसेच कागदपत्रांची पडताळणी करुन स्वतःच्या अभिप्रायासह पात्र/अपात्र/अपूर्ण (Eligible / Non-eligible / Incomplete) असा शेरा ऑनलाईन पध्दतीने देऊन पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवावयाचे आहेत. वरील प्रमाणे कार्यवाही केल्यावर संबंधित कर्मचाऱ्याच्या Login मध्ये कार्यवाही पूर्ण केलेल्या अर्जाची एकत्रित यादी (pdf स्वरुपात) काढण्याची सुविधा दिलेली आहे. शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांनी त्यांच्या Login मधून प्राप्त यादीतील (pdf) सर्व नावनोंदणी अर्जाची व कागदपत्रांची पडताळणी करुन सदर यादीवर आपले अभिप्राय नोंदवावेत व पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवावेत, त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या सर्व अर्जाबाबत अंतिम निर्णय पात्र/अपात्र (Eligible / Non-eligible) असा शेरा ऑनलाईन पध्दतीने देऊन अर्ज निकाली काढावयाचा आहे. अर्ज पात्र केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांचे Enrollment Certificate तयार होऊन सर्व संबंधित घटकांस त्यांच्या Login मध्ये उपलब्ध होईल, तसेच Enrollment Certificate ची Digital प्रत विद्यार्थ्याने नोंदविलेल्या email address वर पाठविण्यात येईल.

१६. एखादा अर्ज कागदपत्रांअभावी अपात्र ठरल्यास त्या विद्यार्थ्यांकडून संबंधित कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन अंतिम कार्यवाही करावी. अपात्र विद्यार्थ्यांस प्रक्रिया शुल्काचे रु. १००/- वगळून उर्वरित रक्कम परत करण्यात यावी.

१७. सदर प्रक्रिया ऑनलाईन असल्याने यासंदर्भातील विभागीय मंडळ स्तरावरील सर्व कामकाज विभागीय मंडळातील गणकयंत्र विभाग व खाजगी विद्यार्थी शाखा यांचेकडून समन्वयाने करुन घेण्यात यावे,

१८. स्वाध्याय पुस्तिका ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या संकेतस्थळावर सरावासाठी इंग्रजी, मराठी, हिंदी व उर्दू माध्यमात उपलब्ध होतील. याबाबत संबंधित विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक/विषय शिक्षकांकडूनच सूचना व मार्गदर्शन देणेबाबत सूचित करावे. स्वाध्याय पुस्तिका ऑफलाईन पध्दतीने देण्यात येणार नसल्याने स्वाध्याय पुस्तिका सोडवून त्या तपासणे व त्याचे गुण

कळविणे ही पध्दत बंद करुन नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे खाजगी विद्यार्थ्यांची तोंडी, प्रात्यक्षिक, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा घेऊन या परीक्षांचे गुण online पध्दतीने नोंदवून विहीत मुदतीत विभागीय मंडळाकडे सादर करणे आवश्यक असल्याचे सर्व शाळांना सूचित करावे.

१९. शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राहय धरण्यात यावा. दि. ३० जून पूर्वी विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला असणे आवश्यक आहे व दि. १ जुलै रोजी कोणत्याही मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेच्या हजेरी पटावर त्याचे नाव असणार नाही.

२०. इ. १०वी फेब्रु मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्याबाबतची पोहोचपावती विद्यार्थ्याला/संबंधित शाळेस त्यांच्या Login मध्ये प्राप्त होईल.

२१. एकदा नावनोंदणी अर्ज शाळेला ऑनलाईन सादर केल्यानंतर कुठल्याही स्तरावर त्रुटी पुर्ततेसाठी सदर अर्ज विद्यार्थ्यांस प्राप्त झाल्यास विद्यार्थ्याला त्याचे नाव, त्याचा सध्याचा पत्ता (Current address) माध्यम, शाळा यामध्ये कुठलाही बदल करता येणार नाही.

२२. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हावयाचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या प्राधिकृत केलेल्या रुग्णालयाच्या प्रमाणपत्राची / UDID Card ची छायाप्रत प्रमाणित करुन अर्जासोबत सादर करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषय योजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

२३. महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत इ. ५वी किंवा इ. ८वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इ. १० वी साठी खाजगी विद्यार्थी (१७ नं.) म्हणून नावनोंदणी करता येईल.

२४. पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह त्याच शाळेतून भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळेमार्फत करुन द्यावी व आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे त्यांना परत करण्यात यावीत.

२५. ज्या शाळेमधून विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे त्याच माध्यमिक शाळेमार्फत आवेदनपत्र संदर्भातील अनुषंगिक कागदपत्रे जमा करण्याबाबत सर्व माध्यमिक शाळांना विभागीय मंडळामार्फत सूचना देण्यात याव्यात.

२६. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी प्रत्येक शाळेने आपल्याच शाळेतील माजी विद्यार्थी, आपल्याच गावातील विद्यार्थी किंवा सध्याच्या पत्त्यानुसार नजीकच्या परिसरातील विद्यार्थी यांचेच नावनोंदणी अर्ज प्रवेशित क्षमतेच्या मर्यादित (५० विद्यार्थी) स्वीकारावेत. तसेच ज्या शाळा आपल्या माजी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज स्वीकारत नाहीत अशा शाळांची तकार प्राप्त झाल्यास त्या शाळांविरुध्द कारवाई करण्यात येईल, असे सर्व शाळांना सूचित करावे.

२७. प्रथम नावनोंदणी केलेल्या ५० विद्यार्थी क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे ५१ ते १०० विद्यार्थी क्षमतेसाठी संबंधित शाळांनी परवानगी घेणे आवश्यक आहे. याबाबत ५० ची क्षमता वाढविणेसाठी विभागीय मंडळाने संबंधित माध्यमिक शाळेची लेखी मागणी आल्यानंतर विभागीय अध्यक्षांची मान्यता घेऊन अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव राज्य मंडळ कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे .

Mali

(डॉ.दिपक माळी )
सचिव
राज्य मंडळ पुणे -०४

दिनांक - ३१/०७/२०२६

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४
# इ. १२ वी साठी खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी विभागीय मंडळांना सूचना

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु-मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांची (फॉर्म नं. १७) ऑनलाईन नावनोंदणी दिनांक- ०१/०८/२०२६ पासून सुरु करण्यात येत आहे.

यासंदर्भातील सर्व मार्गदर्शक व सूचना मंडळाच्या संकेतस्थळावर **http://www.mahahsscboard.in** प्रसिध्द करण्यात येत आहेत. नावनोंदणी प्रक्रियेबाबत प्रकटन काढून त्याबाबतची माहिती सर्व विभागीय मंडळांनी संबंधितांना देण्यात यावी.

१. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु-मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी शर्तीनुसार नावनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत.

२. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु-मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत –

| अ.क्र | तपशील | नियमित /विलंब/अतिविलंब शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी **नियमित** नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे | शनिवार दि. ०१/०८/२०२६<br>ते<br>बुधवार दि. ३०/०९/२०२६ |
| २. | विद्यार्थ्यांनी **विलंब** शुल्काने नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | (प्रति विद्यार्थी रू.१००/-)<br>गुरुवार दि. ०१/१०/२०२६<br>ते<br>गुरुवार दि. १५/१०/२०२६ |
| ३. | विद्यार्थ्यांनी **अतिविलंब** शुल्काने नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन मूळ अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावती च्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | (प्रति विद्यार्थी प्रति दिन रू.२०/-)<br>शुक्रवार दि. १६ /१०/२०२६<br>ते<br>शनिवार दि.३१/१०/२०२६ |

३. खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.इ.१०वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी त्यांच्या यापूर्वी शिकलेल्या शाळेमधील कनिष्ठ महाविद्यालय मधून इ.१२वी साठी खाजगी विदयार्थी नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे व परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्यांनि सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या रहिवासी दाखल्यावरील पत्ता नमूद करणे आवश्यक आहे.

४. खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी त्याच्या मागील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन त्याचा सांकेतिक कमांक, शाखा (Stream), विषय योजना, माध्यम व इतर आवश्यक माहिती घेऊनच नाव नोंदणी करावी.

५. इ. १२वीच्या परीक्षेसाठी नावनोंदणी अर्ज करतांना विद्यार्थ्यांनी http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरील Student Corner या option चा वापर करावा, अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी / इंग्रजीमधून उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

६. विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याकरिता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास द्वितीय प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो स्वतः जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरतांना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव विद्यार्थ्यांकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे.

७. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो (pdf) काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

८. संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर पाठविली जाणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांनी या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, ऑनलाईन शुल्क भरल्याची पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत print out काढून घ्यावीत.

९. विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करावयाची आहेत.

१०. **खाजगी विद्यार्थी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे** -

रु. १११०/- नावनोंदणी शुल्क + रु. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing Fee)
रु. १००/- विलंब शुल्क प्रति विद्यार्थी
रु.२०/- अतिविलंब शुल्क प्रति विद्यार्थी प्रति दिवस

११. संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन / प्राप्त झालेल्या अर्जातील माहिती तसेच upload केलेल्या सर्व मूळ कागदपत्रांच्या प्रती उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जमा असल्याबाबतची खात्री करावी व त्याची पडताळणी करुन माहिती / कागदपत्रे अपूर्ण असल्यास सदर अर्ज "अपूर्ण" (Incomplete) या प्रकारे नोंदवून विद्यार्थ्यांकडे त्रुटी पुर्ततेसाठी पाठवावयाचे आहेत. तसेच इतर परिपूर्ण अर्ज व कागदपत्रे विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पाठवावयाचे आहेत व मूळ कागदपत्रे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्येच ठेवावयाची आहेत.

१२. सदरील काम करणाऱ्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य/ज्येष्ठ शिक्षक व लिपिक यांना या कामाबानत पुढील दराने मानधन देण्यात यावे-

अ) प्राचार्य तथा ज्येष्ठ शिक्षक-

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. १५०/- |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रु. १५०/- रु. १०/- प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रु. ५००/- |

ब) लिपिक-

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रु १००/- |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रु. १००/- रु. १०/- प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रु. २००/- |

१३. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांनि त्यांच्या यापूर्वी शिकलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता

नमूद करणे आवश्यक आहे व परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्याने सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या रहिवासी दाखल्यावरील पत्ता नमूद करणे आवश्यक आहे. या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे व यासंदर्भातील गुण online पध्दतीने नोंदवून मंडळाकडे विहीत मुदतीत पाठवावयाचे आहेत व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकिटात, पाकिटावर उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव, सांकेतिक क्रमांक (index no.) टाकून विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत.

१४. विभागीय मंडळ स्तरावर खाजगी विद्यार्थ्यांचे अर्ज Maker/Checker पध्दतीने तपासावयाचे आहेत. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले अर्ज नेमून दिलेल्या जिल्हा / तालुका नुसार संबंधित कर्मचाऱ्याला (Desk 1 user) त्यांचे Login मध्ये उपलब्ध होतील.

१५. संबंधित खाजगी विद्यार्थ्यांनी त्यांच्या मागील माध्यमिक शाळेच्या उच्च माध्यमिक विद्यालयामधून खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी अर्ज भरला आहे ,याची विभागीय मंडळांनी खात्री करावी

१५. संबंधित कर्मचाऱ्यांनी online पध्दतीने प्राप्त अर्ज तसेच कागदपत्रांची पडताळणी करुन स्वतःच्या अभिप्रायासह पात्र/अपात्र / अपूर्ण (Eligible/Non-eligible/Incomplete) असा शेरा ऑनलाईन पध्दतीने देऊन पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवावयाचे आहेत. वरील प्रमाणे कार्यवाही केल्यावर संबंधित कर्मचाऱ्याच्या Login मध्ये कार्यवाही पूर्ण केलेल्या अर्जाची एकत्रित यादी (pdf स्वरुपात) काढण्याची सुविधा दिलेली आहे. शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांनी त्यांच्या Login मधून प्राप्त यादीतील (pdf) सर्व नावनोंदणी अर्जाची व कागदपत्रांची पडताळणी करुन सदर यादीवर आपले अभिप्राय नोंदवावेत व पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवावेत, त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या सर्व अर्जाबाबत अंतिम निर्णय पात्र/अपात्र (Eligible / Non-eligible) असा शेरा ऑनलाईन पध्दतीने देऊन अर्ज निकाली काढावयाचा आहे. अर्ज पात्र केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांचे Enrollment Certificate तयार होऊन सर्व संबंधित घटकांस त्यांच्या Login मध्ये उपलब्ध होईल, तसेच Enrollment Certificate ची Digital प्रत विद्यार्थ्याने नोंदविलेल्या e-mail address वर पाठविण्यात येईल.

१६. एखादा अर्ज कागदपत्रांअभावी अपात्र ठरल्यास त्या विद्यार्थ्यांकडून संबंधित कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन अंतिम कार्यवाही करावी, अपात्र विद्यार्थ्यांस प्रकिया शुल्काचे रु. १००/- वगळून उर्वरित रक्कम परत करण्यात यावी.

१७. सदर प्रकिया ऑनलाईन असल्याने यासंदर्भातील विभागीय मंडळ स्तरावरील सर्व कामकाज विभागीय मंडळातील गणकयंत्र विभाग व खाजगी विद्यार्थी शाखा यांचेकडून समन्वयाने करुन घेण्यात यावे.

१८. फेब्रु-मार्च २०२५ व जून-जुलै २०२५ परीक्षेमध्ये इ. १०वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी फेब्रु-मार्च २०२७ च्या इ.१२वी परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होण्यास पात्र ठरतील, अशा विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दिनांक दि. ३१ ऑगस्ट २०२५ ग्राह्य धरण्यात यावा.

१९. शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राहय धरण्यात यावा.

२०. इ. १२वी फेब्रु- मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्याबाबतची पोचपावती विद्यार्थ्याला/संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास त्यांच्या Login मध्ये प्राप्त होईल.

२१. एकदा नावनोंदणी अर्ज कनिष्ठ महाविद्यालयात ऑनलाईन सादर केल्यानंतर कुठल्याही स्तरावर त्रुटी पुर्ततेसाठी सदर अर्ज विद्यार्थ्यांस प्राप्त झाल्यास विद्यार्थ्याला त्याचे नाव, त्याचा सध्याचा पत्ता (Current address), शाखा (Stream), माध्यम, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यामध्ये कुठलाही बदल करता येणार नाही.

२२. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हावयाचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या प्राधिकृत केलेल्या रुग्णालयाच्या प्रमाणपत्राची / UDID Card ची छायाप्रत प्रमाणित करुन अर्जासोबत सादर करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषययोजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

२३. जे उमेदवार कनिष्ठ महाविद्यालयीन प्रथम वर्षाची परीक्षा (इ. ११ वी) उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण असतील, तर त्यांचे नाव संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या हजेरी पटावर ३१ मे नंतर नसावे.

२४. पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत करुन द्यावी व आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे त्यांना परत करण्यात यावीत.

२५. ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यास शास्त्र, कला व वाणिज्य शाखेस प्रवेश घ्यायचा असेल, त्या उच्च माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास सदरच्या शाखेस मंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे.

२६. ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे, त्याच उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत आवेदनपत्रासंदर्भातील अनुषंगिक कागदपत्रे जमा करण्याबाबत सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळामार्फत सूचना देण्यात याव्यात.

२७. परराज्यातील विद्यार्थ्यांनी फॉर्म नं. १७ भरला असेल तर, ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत संबंधित विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे, त्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत योग्यता प्रमाणपत्राचा (Eligibility Certificate) अर्ज online पध्दतीने विभागीय मंडळाकडे येणे आवश्यक आहे.

२८.उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी प्रत्येक उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्याच उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थी, आपल्याच गावातील विद्यार्थी किंवा सध्याच्या पत्त्यानुसार नजीकच्या परिसरातील विद्यार्थी यांचेच नावनोंदणी अर्ज प्रवेशित क्षमतेच्या मर्यादेत (५० विद्यार्थी) स्वीकारावेत. तसेच ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय आपल्या माजी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज स्वीकारत नाहीत अशा उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची तकार प्राप्त झाल्यास त्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांविरुध्द कारवाई करण्यात येईल, असे सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करावे.

२९. प्रथम नावनोंदणी केलेल्या ५० विद्यार्थी क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे ५१ ते १०० विद्यार्थी क्षमतेसाठी संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परवानगी घेणे आवश्यक आहे. याबाबत ५० ची क्षमता वाढविणेसाठी विभागीय मंडळाने संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची लेखी मागणी आल्यानंतर विभागीय अध्यक्षांची मान्यता घेऊन अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव राज्य मंडळ कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

दिनांक -३१ /०७ /२०२६

Mali

(डॉ. दिपक माळी )
सचिव
राज्य मंडळ पुणे -०४

क्र.कोविमं/१२ वी/परीक्षा/ 2739
दिनांक :- ०३/०८/२०२६
04 AUG 2026

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये/शाळा,
जिल्हा- सातारा,सांगली,कोल्हापूर.

विषय:-माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रु-मार्च २०२७ परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ठ (अर्ज क्र. १७ अन्वये) होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी प्रक्रियेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मंडळामार्फत फेब्रु-मार्च 2027 मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेस खाजगीरित्या (अर्ज क्र. 17अन्वये) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी प्रक्रियेबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडलेले आहे. त्यानुसार उचित कार्यवाही करावी तसेच सदरचे प्रकटन आपल्या कनिष्ठ महाविद्यालय/शाळेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करुन सर्व विद्यार्थ्यांच्या/ पालकांच्या निदर्शनास आणून देण्याची कार्यवाही करावी.

(अनुराधा म्हेत्रे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

# उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा

{इयत्ता १२ वी}

## खाजगी विद्यार्थी
## थेट अर्ज योजना

# खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७)
# माहिती व मार्गदर्शक सूचना

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारासाठी पात्रतेच्या अटी

१. विद्यार्थी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) किंवा राज्याबाहेरील तत्सम समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर दोन विद्या वर्षानंतर इयत्ता बारावी परीक्षेस प्रविष्ट होण्यास पात्र होईल. (उदा. एखाद्या विद्यार्थ्याने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२५/जुलै २०२५ मध्ये उत्तीर्ण केली असेल, तर दोन विद्यावर्षाच्या खंडानंतर म्हणजे फेब्रुवारी - मार्च २०२७ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी तो पात्र ठरेल.

२. जे उमेदवार कनिष्ठ महाविद्यालयीन प्रथम वर्षाची परीक्षा (इ. ११ वी) उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण असतील, तर त्यांचे नाव संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या हजेरी पटावर ३१ मे नंतर नसावे.

३. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षा अथवा समकक्ष परीक्षा इंग्रजी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

४. पदविका (डिप्लोमा) धारक किंवा अन्य कोणतीही शैक्षणिक अर्हता प्राप्त विद्यार्थी पात्र असेल.

५. तांत्रिक / व्यावसायिक / किमान कौशल्य अभ्यासक्रम गटातील विषय घेता येणार नाहीत.

६. नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) भरून खाजगीरितीने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस विज्ञान शाखेअंतर्गत नाव नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यास माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र वा तत्सम परीक्षेस विज्ञान विषयात किमान ३५ टक्के गुण असावेत, तसेच ज्या कनिष्ठ महाविद्यालयास विज्ञान शाखेस मंडळाची मान्यता देण्यात आलेली आहे, अशा कनिष्ठ महाविद्यालयातूनच नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) मंडळाकडे पाठविणे बंधनकारक आहे.

७. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९/प्र.क.(२४३/१९)/एसडी -४, दि. ०८ ऑगस्ट २०१९ व शासन शुद्धीपत्रक क्रमांक-अभ्यास-२११८/प्र.क.२४३/एसडी -४, दि. ११ नोव्हेंबर २०१९ च्या सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजनेप्रमाणेच परीक्षेसाठी विषयांची निवड करावी लागेल.

८. विद्यार्थ्यास द्वितीय भाषेऐवजी माहिती तंत्रज्ञान हा विषय घेता येईल. मात्र सदर विषयास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने मान्यता घेतलेली असावी. तसेच प्रयोगशाळेची क्षमता असावी.

९. परराज्यातील / राज्य मंडळाव्यतिरिक्त इतर संविधानिक मंडळाची इ.१०वी उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी संबंधित विभागीय मंडळाकडे योग्यता प्रमाणपत्राची (Eligibility Certificate) मागणी करणे आवश्यक आहे. योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) विहित कालावधीत प्राप्त करून घेणे गरजेचे आहे. अन्यथा मंडळाने वेळोवेळी वितरीत केलेल्या परिपत्रकानुसार दंड अनुज्ञेय राहील. याबाबत कनिष्ठ महाविद्यालयानी मंडळाच्या सूचनेनुसार सत्वर कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१०. **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्याने यापूर्वी शिकलेल्या शाळेचा पत्ता टाकावा व परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्याने सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या रहिवासी दाखल्यावरील पत्ता नमूद करणे आवश्यक आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यमानुसार, त्यास उच्चमाध्यमिक शाळांची यादी दिसेल, त्यामधील एका उच्च माध्यमिक शाळेची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे.**

११. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/प्राधिकृत केलेल्या रुग्णालयाच्या प्रमाणपत्राची / UDID Card ची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी.

**नाव नोंदणी अर्जासोबत (फॉर्म नं. १७) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अपलोड (upload) करावयाची कागदपत्रे**

१. इ. १०वी ची मूळ गुणपत्रिका.

२. इ. १०वी उत्तीर्णतेचे मूळ प्रमाणपत्र.

३. इ. १०वी/ इ. ११वी शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय/पॉलिटेक्निक कॉलेज सोडल्याचा मूळ दाखला (Original T.C.), दुय्यम दाखला (Duplicate T.C.) जोडल्यास मागील दोन वर्षात कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गात नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला नसल्याबाबत कोऱ्या कागदावर स्वाक्षांकीत केलेले प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.

४. इ. ११वी परीक्षेची मूळ गुणपत्रिका.

५. रहिवासी पुरावा - रेशनकार्ड/आधार कार्ड/मतदान ओळखपत्र/सक्षम अधिकाऱ्यांचे (विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बदली आदेशाची प्रमाणित छायाप्रत) विहित नोंदणी प्रमाणपत्र.

६. विद्यार्थ्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र (प्रपत्र क्रमांक-१)

७. शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला (Original T.C.) न जोडता दुय्यम दाखला (Duplicate T.C.) जोडल्यास, मूळ दाखला का सादर करू शकत नाही याचे कारण नमूद करून व मागील दोन वर्षात कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गामध्ये नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला नसल्याबाबत मा.न्यायाधीशासमोर रु.१००/- च्या जनरल स्टॅम्प पेपरवर कोर्ट फीसह केलेले प्रतिज्ञापत्र (AFFIDAVIT) जोडणे आवश्यक आहे. नमूना सोबत जोडला आहे. (प्रपत्र क्रमांक -२)

८. पूर्व परवानगी शिवाय खाजगी विद्यार्थ्यांचे ५० पेक्षा जास्त फॉर्म नं. १७ न पाठविण्याबाबतचे हमीपत्र (प्रपत्र - अ)

९. भाषा विषय तोंडी परीक्षा, पर्यावरण विषयाचा अभ्यासक्रम व प्रकल्प, प्रात्यक्षिके पूर्ण करून घेण्याबाबतचे हमीपत्र (प्रपत्र – ब)

१०. खाजगी विद्यार्थ्यांने घेतलेल्या विषयात प्रात्यक्षिके असतील तर त्यास ती पूर्ण करण्यासाठी मिळणाऱ्या सुविधेसाठी कनिष्ठ महाविद्यालयाकडे एकत्रित शुल्क रु. १०० /- भरावे लागतील.

११. अपूर्ण/चुकीची माहिती नोंदविलेल्या, अपूर्ण कागदपत्रे असलेल्या, कमी शुल्क भरलेल्या नाव नोंदणी अर्जावर (फॉर्म नं. १७) कार्यवाही केली जाणार नाही. तसेच पोस्टाद्वारे पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१२. इ. १२ वीच्या नियमित परीक्षेमाठी कोणताही (फॉर्म नं. १७ सहित) खाजगी विद्यार्थी क्रीडा सवलतीच्या अतिरिक्त गुणांसाठी पात्र राहील. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी आपल्या उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत सदर प्रस्ताव विहित नमुन्यात व विहित मुदतीत प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतींसह मान्यतेसाठी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यामार्फत मंडळ कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.

१३. विद्यार्थ्याने ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी केली असेल त्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास जे परीक्षा केंद्र आहे त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा देणे बंधनकारक राहील.

## नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाच्या सूचना

१) खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१२ वीसाठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

२) खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून मंडळाची परीक्षा द्यावयाची आहे, त्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक, शाखा, विषय योजना, माध्यम व इतर आवश्यक माहिती घेऊनच नोंदणी करावी.

३) इयत्ता १२ वी च्या परीक्षेसाठी नावनोंदणी अर्ज करतांना विद्यार्थ्यांनी **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावरील Student Corner या option चा वापर करावा, अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

४) **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (वी१२ .इ)परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्याने त्यांच्या पूर्वीच्या उच्च माध्यमिक शाळाकनिष्ठ / महाविद्यालयाचे नाव व पत्ता नमूद करणे आवश्यक आहे व परराज्यातीलपरदेशातील विद्यार्थ्याने सक्षम / प्राधीकारी यांनी दिलेल्या रहिवासी दाखल्यावरील पत्ता नमूद करणे आवश्यक आहे .या उच्च माध्यमिक शाळाकनिष्ठ महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र/, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिकतोंडी/, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे व यासंदर्भातील गुण online पध्दतीने नोंदवून मंडळाकडे विहीत मुदतीत पाठवावयाचे आहेत व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकिटात, पाकिटावर उच्च माध्यमिक शाळाकनिष्ठ महाविद्यालयाचे नाव/, सांकेतिक क्रमांक )index no.) टाकून विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत.**

५) विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरिता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), २) मूळ प्रत नसल्यास, द्वितीयप्रत असल्याचे प्रतिज्ञापत्र (प्रपत्र-२) ३) आधारकार्ड ४) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो व अनुषंगिक कागदपत्रे ऑनलाईन अर्ज भरताना स्कॅन करून अपलोड (pdf) करावयाची आहेत. काही कारणास्तव विद्यार्थ्याकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर प्रपत्र-२ (प्रतिज्ञा पत्राचा नमूना) जोडणे आवश्यक आहे.

६) विद्यार्थ्यांनी शेवटी सोडलेली शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय हे संबंधित विभागीय मंडळाच्या अधिकार क्षेत्राबाहेरील असेल तर दाखल्याच्या (T.C./L.C.) पाठीमागे सदर दाखला अधिकृत असल्याबाबत संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक / गट शिक्षणाधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी आवश्यक आहे. परराज्यातील विद्यार्थी असेल तर त्याच्या सक्षम अधिकाऱ्याची प्रतिस्वाक्षरी आवश्यक आहे.

७) कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/ मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड (pdf) करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

८) खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पद्धतीने (Debit card/Credit card/ UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पद्धतीने शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावती विद्यार्थ्यास व संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास त्यांच्या Login मध्ये प्राप्त होईल.

९) एकदा नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास सादर केल्यानंतर कुठल्याही स्तरावर त्रुटी पुर्ततेसाठी सदर अर्ज विद्यार्थ्यास प्राप्त झाल्यास विद्यार्थ्यास त्याचे नाव, त्याचा सध्याचा पत्ता, माध्यम, कनिष्ठ महाविद्यालय, शाखा, विषय यामध्ये कुठलाही बदल करता येणार नाही.

